|| अल्पारंभ: क्षेमकर:||

SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

गवाक्ष

......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक: ARN- ९०७४६

अंक ५१ : धन सुरक्षा विशेष

श्री. संदीप देशमुख
संचालक

तुमचं विस्मृतीत गेलेले धन परत मिळवा @ RBI UDGAM Portal

पुरेशी काळजी घेतली नाही ,कागदपत्रांची नीट नोंद ठेवली नाही, आळसापोटी दुर्लक्ष केले की कधी कधी आपलीच संपत्ती आपल्या नकळत गहाळ होते. आणि जेव्हा अशा अनेकांची हीच परिस्थिती होते तेव्हा लहान-सहान ठेवी एकत्रितपणे मोठा आकडा उभा करतात. जुलै २०२५ च्या आकडेवारीनुसार **भारतीय बँकांमध्ये ₹६७,००३ कोटींपर्यंतच्या अवशेष ठेवी (Unclaimed Deposits) जमा आहेत.** अशा ठेवी अनेकदा खातेदारांच्या मृत्यूनंतर किंवा दीर्घकाळ व्यवहार न केल्यामुळे निष्क्रिय खात्यांमध्ये राहतात. RBI (रिझर्व बँक ऑफ इंडिया) ने नागरिकांना हे पैसे परत मिळवण्यासाठी एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे, ते म्हणजे **UDGAM पोर्टल**!!

UDGAM: UDGAM (Unclaimed Deposits – Gateway to Access inforMation) हे RBI द्वारे सुरु करण्यात आलेलं एक सेंट्रल ऑनलाइन पोर्टल आहे. **याच्या माध्यमातून तुम्ही विविध बँकांमधील तुमच्या किंवा तुमच्या नातलगांच्या नावे असलेली हरवलेली ठेवी शोधू शकता.**

UDGAM पोर्टल द्वारे पुढील माहिती मिळवता येते: तुमच्या नावे असलेली निष्क्रिय बँक खाती, FD किंवा RD चे रकमेचे तपशील, मृत व्यक्तींच्या नावाने असलेले निधी कोणत्या बँकेत आहेत, असे व इतर तपशील.

UDGAM पोर्टलचा वापर: यासाठी **https://udgam.rbi.org.in** या पोर्टलवर जाऊन, आपली युजर म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. Register करण्यासाठी तुमचे नाव, मोबाइल क्रमांक, ईमेल नोंदवावे लागतात आणि OTP द्वारे लॉगिन करता येते. या पोर्टलवर खातेदाराचे नाव, जन्मतारीख, ओळख क्रमांक (PAN/Aadhaar वैकल्पिक) दिली असता तुमच्या नावावर ठेवी असल्यास त्याचे तपशील दिसतात आणि तुम्हाला पुढे त्या बँकेशी संपर्क साधून रक्कम परत मिळवण्यासाठी प्रक्रिया पूर्ण करता येते.

जुलै २०२५ पर्यंत ८.५९ लाखाहून अधिक लोकांनी UDGAM पोर्टल वापरून आपले पैसे शोधले आहेत. केवळ SBI मध्येच ₹१९,३३० कोटी रुपये असे निष्क्रिय ठेव स्वरूपात आहेत. लक्षात ठेवा, हरवलेली संपत्ती तुमच्याच नावे आहे, फक्त शोध घेण्याची आणि संबंधित प्रक्रिया पार पाडण्याची गरज आहे! आजच या पोर्टलला भेट द्या आणि तपासा. कदाचित, तुमचं किंवा तुमच्या कुटुंबाचं धन तुमची वाट पाहत असेल.

"Your hard-earned money deserves attention.

Stop searching the old way — start claiming with UDGAM."

वैयक्तिक अपघात विमा : आजच्या काळाची अत्यावश्यक गरज

श्री. विक्रांत राठोड,
वरिष्ठ वित्तीय व्यवस्थापक

भारतामध्ये रस्ते अपघातांची संख्या चिंताजनक पातळीवर आहे. दरवर्षी अंदाजे १२ लाख लोक रस्ते अपघातात मरण पावतात आणि ५ कोटी लोक जखमी होतात. आपला देश रस्ते अपघातांची सर्वाधिक आकडेवारी असलेला देश आहे. एका ताज्या अहवालानुसार, देशात दररोज सुमारे १,२६४ रस्ते अपघात होतात आणि त्यातून सुमारे ४६२ मृत्यू होतात. याचा अर्थ प्रत्येक तासाला ५३ अपघात आणि १९ मृत्यू होतात. हे आकडे भीतीदायक तर आहेतच शिवाय प्रत्येक व्यक्तीने आपल्या सुरक्षितता आणि त्याद्वारे येणाऱ्या संभाव्य आर्थिक बोज्याकडे गंभीरपणे पाहावे असे सूचित करणारे आहेत.

वैयक्तिक अपघात विमा गरजेचा का आहे? सडक दुर्घटना किंवा अपघात अचानक होतात आणि त्याचे परिणाम केवळ शारीरिक किंवा मानसिकच नसतात, तर आर्थिक दृष्ट्याही मोठे संकट निर्माण करतात. अशा परिस्थितीत वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) ही मोठी सुरक्षा ठरते. या विम्यामुळे अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व (कायमचे/तात्पुरते) आल्यास वैद्यकीय खर्च आणि इतर संबंधित खर्चांसाठी आर्थिक मदत मिळते. यामुळे व्यक्ती आणि कुटुंबाला अपघाताच्या आर्थिक परिणामांपासून सुरक्षित ठेवण्यास मदत होते.

फायदे वैयक्तिक अपघात विम्याचे:
अपघाती मृत्यूसाठी भरपाई: अपघातामुळे विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबाला विमा म्हणून ठरलेली रक्कम मिळते, जी त्यांना आर्थिक अडचणीतून सावरण्यास मदत करते.
अपंगत्वासाठी संरक्षण: अपघातामुळे विमाधारकास कायमस्वरूपी किंवा तात्पुरते अपंगत्व आल्यास पॉलिसीच्या अटींनुसार आर्थिक भरपाई मिळते.
वैद्यकीय खर्चाचे संरक्षण: अपघाता मुळे हॉस्पिटलायझेशन झाल्यास, लागणाऱ्या वैद्यकीय उपचारांचा खर्च तसेच होणारी पगार तुट विमा पॉलिसीद्वारे कव्हर केली जाते, ज्यामुळे मोठा आर्थिक भार वाचतो.
आर्थिक सुरक्षा: अपघात ही अनपेक्षित घटना असून, त्यामुळे अचानक येणाऱ्या आर्थिक संकटांना सामोरे जाण्यासाठी विमा एक मोठा आधार असतो.
कौटुंबिक आधार: विमाधारकाच्या अनुपस्थितीत कुटुंबाला आर्थिक मदत मिळवून देण्यास हा विमा खूप उपयुक्त ठरतो.

हे ही लक्षात घ्या ! वैयक्तिक पॉलिसीमध्ये केवळ एक व्यक्तीचा समावेश असतो, पण फॅमिली प्लॅन्समध्ये पती/पत्नी व अवलंबित मुले यांचा समावेश करता येतो. काही मोठ्या कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांना ग्रुप पॉलिसीद्वारे कव्हर देतात, परंतु प्रत्येक व्यक्तीने स्वतःसाठी, योग्य विमा सुरक्षा असणारी स्वतंत्र पॉलिसी घेणे आर्थिक सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे. वास्तव परिस्थितीत, सध्या भारतातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत वैयक्तिक अपघात विमा घेणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. बरेच लोक नोकरीतील गट विम्यावर अवलंबून राहतात. पण नोकरी बदलली किंवा निवृत्तीनंतर असे कव्हर आपोआप संपते. म्हणूनच, स्वतंत्र पॉलिसी घेणे शहाणपणाचे ठरते.

निष्कर्ष: अपघात कधी, कुठे, कोणावर होईल हे कुणालाच सांगता येत नाही. पण योग्य वैयक्तिक अपघात विमा घेऊन आपण आपल्या कुटुंबाचे आर्थिक रक्षण नक्कीच करू शकतो. जीवन अनमोल आहे, आणि त्याला आर्थिक कवच देणे ही आपली जबाबदारी आहे. म्हणूनच विचार करा – 'आपल्याकडे वैयक्तिक अपघात विमा आहे का?' नसल्यास जरूर आमच्याशी संपर्क साधा !!

आपली डिजिटल सुरक्षा ..आपल्याच हाती !!

श्री. हृषभ सोनवणे,
व्यवसाय विकास व्यवस्थापक

ऑनलाईन बँकिंग, खरेदी आणि पेमेंट्समुळे आपलं जीवन कधी नव्हतं इतकं सोपं झालं आहे. पण या सोयीबरोबरच फसवणूक, फिशिंग आणि सायबर फसवेगिरीचा धोका झपाट्याने वाढत आहे. थोडी जागरूकता आणि वेळेवर घेतलेली काळजी तुमचे आर्थिक धोक्यापासून संरक्षण करू शकते. तेव्हा सायबर सुरक्षेसाठी पाळायलाच हवेत असे काही नियम पाहुयात !

मजबूत, वेगळे बँकिंग पासवर्ड वापरा: डिजिटल आर्थिक व्यवहारांसाठी अक्षरे, अंक आणि चिन्हे एकत्र करून पासवर्ड तयार करा. एकच पासवर्ड अनेक खात्यांसाठी वापरू नका. पासवर्ड वेळोवेळी बदला. सोपे, सहज ओळखता येतील असे पासवर्ड कधीही ठेवू नका.

फक्त अधिकृत ऍप्स वापरा: सोशल मीडियावर जाहिरातीत दाखविलेले किंवा मेसेजवर आलेल्या लिंकद्वारे डाउनलोड केलेले अँप्स विश्वासार्ह / अधिकृत असतीलच असे नाही, हे नेहेमी लक्षात ठेवा. बँकिंग व पेमेंट अँप्स नेहमी विश्वासार्ह व अधिकृत स्त्रोतांमधूनच डाउनलोड करा.

सुरक्षित नेटवर्क वापरा: आर्थिक व्यवहारांसाठी सार्वजनिक Wi-Fi टाळा. मोबाईल डेटा किंवा विश्वासार्ह नेटवर्कचा वापर करा. असे प्रायव्हेट नेटवर्क सायबर गुन्हेगारांना ताब्यात घेणे कठीण असते.

डिव्हाइस अपडेट ठेवा: आपल्या मोबाईल वरील ऑपरेटिंग सिस्टिम, अँप्स व अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचे नवे अपडेट्स नेहमी इन्स्टॉल करा. त्यामुळे नवीन येणाऱ्या फ्रॉड्स विरुद्ध लढण्यास तुमचे डिव्हाईस सक्षम होते.

ट्रान्झॅक्शन अलर्ट सुरू करा: प्रत्येक डेबिट किंवा क्रेडिट व्यवहारासाठी SMS/ ईमेल अलर्ट सुरू ठेवा.

तक्रार तात्काळ कळवा: सायबर फसवणुकीचा संशय आला तर लगेच राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टलवर (www.cybercrime.gov.in) आपली तक्रार नोंदवा किंवा १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधा.

शेवटी म्हणावेसे वाटते की जसे आपण बाहेर जाताना घराचे दरवाजे बंद करतो, तसेच ऑनलाईन जगात आपल्या माहितीचे दरवाजे देखील सुरक्षित ठेवायला शिकायला हवे. आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी इतकी जागरूकता हवीच!

उल्लेखनीय : ऑगस्ट २०२५ पासून आमच्या पुणे शाखा, नूतन कार्यालयाचा शुभारंभ





आमच्या बद्दल थोडेसे...

SWS: आमचा प्रवास: आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रातील आमचा प्रवास १९९५ पासून सुरु आहे. या क्षेत्रातील सर्व सेवा, ग्राहकांना एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या उमद्या हेतूने संस्थेचा प्रवास सुरु झाला. सोपी, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि विश्‍वासाहार्य सेवा ही आमची वैशिष्ट्ये असून आज संस्था व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाते आहे. जोडल्या गेलेल्या ग्राहकांना आर्थिक साक्षरतेकडून, आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत नेण्यासाठी, आमची अनुभवसंपन्न टीम, सदैव प्रामाणिकपणे कार्यरत आहे !

आमच्या सेवा:

- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर (जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.) आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा: म्युच्यअल फंड्स, इक्विटी मार्केट, कॉर्पोरेट फिक्सड डिपॉसिट्स इ. च्या माध्यमातून
- जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- करनियोजन आणि कर्ज सेवा
- व्यवसाय किंवा इतर विशिष्ट हेतूं संदर्भात आर्थिक गुंतवणूक सल्ला, सेवा

आमची वैशिट्ये:

- ३० वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव, AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक
- CFA, CFP सारखी प्रमाणित शैक्षणिक पातळी आणि इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सीसारखी पार्श्वभूमी असणारी अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- विश्वासार्ह आणि निःपक्षपाती सल्ला, सोपा, ग्राहकाभिमुख, पारदर्शी, नैतिक व्यवहार
- वैयक्तिक तसेच संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा संपन्न अनुभव
- पुणे, मुंबई , नागपूर, वर्धा आणि इतर उदोयन्मुख शाखा

व्यावसायिक उत्कृष्टते बरोबरच SWS संस्थेतील प्रत्येकजण आपले सामाजिक भान जपतो! संस्थेच्या सर्व समाजोपयोगी कार्याला अधिक संघटितरित्या आणि परिणामकारक स्वरूपात पुढे न्यावे हा विचार करून, २०१८ मध्ये 'अल्पारंभा एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन' चा उदय झाला. समाजावर प्राथमिक परिणाम करणारी, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्र ही प्रामुख्याने विचारात घेतली गेली. या दोन्ही विषयांच्या कक्षेत कार्य करतांना, त्यातील विविध निकडी ओळखून, त्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करणे आणि समाजामध्ये अर्थ साक्षरता वाढावी यासाठी कार्य करणे ही अल्पारंभाची प्राथमिक उद्दिष्ट्ये आहेत.

॥ अल्पारंभः क्षेमकरः ॥

SWS Financial Solutions Pvt. Ltd.

Comprehensive Financial Consultancy & Services

मुख्य कार्यालय: दुसरा मजला, मंडलिक प्राईड, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक १३.

संपर्क: ०२५३-२ ९७५ ९७५ / ७५०७८ ८४४७७

www.swsfspl.com **https://swsfspl.blogspot.com**

पुणे
श्री. स्वप्नील एकांडे
कार्यालय क्रमांक २६, दुसरा मजला,
द प्लॅटिनम टॉवर्स, बॉलीवूड थिएटरजवळ,
तुकाराम नगर, खराडी, पुणे, ४११०१४
संपर्क: ९८२८७३५०५५ / ७७२००९९२४१
swapnil@swsfspl.com

मुंबई
श्री. किशोर काळे
दुकान क्रमांक 6, दौलत मिनार सीएचएस लि.,
समोर. ठक्कर बेकर्स, शहाजी राजे मार्ग,
विलेपार्ले पूर्व, मुंबई - ४०००५७
संपर्क: ९८६९२३९९४० / ९२२४४३३१२२
kishor@swsfspl.com

नागपूर
श्री नीरज अडबे
फ्लॅट F1, पहिला मजला, योगेश
कॉम्प्लेक्स, ढोमणे ज्वेलर्स समोर, प्रताप
नगर स्क्वेअर, नागपूर -४४००२२
संपर्क: ८३०८८३३७२४
neeraj@swsfspl.com